वाचा :-

१. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई क्र.जिपब-४१४/प्र.क्र.-११२/आस्था-१४/दि. १५.०५.२०१४
२. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग शासन शुध्दीपत्रक जिपब-४१४/ प्र.क्र.-११२/ आस्था-१४/ दिनांक ०२.०७.२०१४
३. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागशासन शुध्दीपत्रक जिपब-४८१६/ प्र.क्र.-१३६/ आस्था-१४/ दिनांक ०२.०१.२०१७.
४. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग शासन पुरक पत्र क्र. जिपब-४८१७/ प्र.क्र.-१२८/ आस्था-१४/ दि ०७.०३.२०१९.
५. या कार्यालयाची अंतिम वास्तव्य जेष्ठता यादी दिनांक ०२ .०५.२०२२
६. अवर सचिव,ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण-२०२२ प्र.क्र.२२६/आस्था-१४ दि.११. मे २०२२.
७. दिनांक २४.०५.२०२२. रोजी झालेले समुपदेशनाचे इतिवृत्तांत

जाक्र./जिपनां/शिअप्रा/प्रा-१९/३१००/२०२२
शिक्षण विभाग प्रा. जिल्हा परिषद नांदेड
दिनांक :- **२४.०५.२०२२.**

**आदेश,**

ज्या अर्थी उपरोक्त संदर्भ क्र.(०१) व (०४) वरील शासन निर्णय व शुध्दीपत्रकात नमूद केलेल्या तरतुदीनूसार शिक्षण विभाग प्रा.जि.प. नांदेडच्या अधिनिस्त **विस्तार अधिकारी शिक्षण** या संवर्गातील कर्मचा-यांची अंतीम वास्तव्य जेष्ठता यादी संदर्भ क्र. (०५) नूसार प्रसिध्द करून त्यातील बदली पात्र कर्मचा-यांचे समुपदेशन दिनांक २४.०५.२०२२ रोजी घेण्यात आले. सदर समुपदेशनात संबधिताने दिलेल्या लेखी विकल्प व घोषणापत्रा नुसार रिक्त पदावर पदस्थापना देणे बाबत विनंती केली होती.

त्या अर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड संदर्भ क्र (०१) व (०४) वरील शासन निर्णयातील तरतुदीनूसार मला प्राप्त अधिकाराचा वापर करून खालील परिशिष्टात नमुद (०८) **विस्तार अधिकारी शिक्षण** यांची त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी प्रशासकीय/ विनंती कारणावरून बदली करीत आहे.

**परिशिष्ट**

| अ. क्रं | शिविअचे पुर्ण नाव | पदनाम | कार्यरत ठिकाण | बदलीचा प्रकार | समुपदेशनात पदस्थापना दिलेले ठिकाण/पं.स |
|---|---|---|---|---|---|
| २ | **सौ. शोभा गंगाधर भारती** | वि.अ.(शिक्षण) | निळा/नांदेड | प्रशासकीय-१ | बीट-बेल्लोरी धा/ किनवट रिक्तपदी |

**अटी व शर्ती :-**

१. वरील परिशिष्टात नमुद ज्या कर्मचा-यांची बदली विनंती कारणावरून करण्यात आली असेल तर पदग्रहण अवधी व प्रवास भता अनुज्ञेय राहणार नाही.
२. संबधित कर्मचारी त्यांच्या बदलीच्या ठिकाणी रूजू होणेसाठी दिनांक २४.०५.२०२२ रोजी मध्यान्होनंतर या आदेशाद्वारे कार्यमुक्त करण्यात येत आहे. संबंधीत कर्मचा-यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार आवश्यकतेनूसार इतर कर्मचा-याकडे सोपविण्या बाबतची कार्यवाही संबंधीत गटशिक्षणाधिकारी / मुख्याध्यापक यांनी करावी.
३. गटशिक्षणाधिकारी /मुख्याध्यापक यांना देवून सुचीत करण्यात येते की, बदली झालेल्या कर्मचा-यांचे दिनांक २४.०५.२०२२ पर्यंतचे वेतन व भत्ते बदली पुर्वीच्या मुळं पदस्थापनेच्या ठिकाणाहून अदा करण्यात यावेत. व दिनांक २५.०५.२०२२ पासूनचे वेतन व भत्ते बदलीने पदस्थापना दिलेल्या कार्यालयातून काढण्यात यावेत. दिनांक २५.०५.२०२२ पासूनचे वेतन व भत्ते मूळ कार्यालयातून काढल्यास त्याची जबाबदारी संबंधीत कार्यालय प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी याची राहील याची नोंद घ्यावी.
४. ज्या कर्मचा-यांची बदली दिनांक ३१.०५.२०२२रोजी सेवानिवृत होणा-या कर्मचा-यांच्या जागेवर झाली असेल अशा कर्मचा-यांना दिनांक ३१.०५.२०२२ रोजी मध्यान्होतर कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी.
५. बदली झालेल्या कर्मचा-यांचा संपूर्ण पदभार स्थानिक व्यवस्था करून अन्य कर्मचा-याकडे सुपूर्द करून पदभार यादीसह संबंधीत कार्यालयास सादर करावा.

६. सदर आदेशाचे पालन जे कर्मचारी करणार नाहीत व बदली रद्द करणेसाठी कुठल्याही स्वरूपाची आवेदने सादर केल्यास संबंधीताविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६(५) नुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

संबंधितास कार्यमुक्त व रूजू करून घेण्याची कार्यवाही करावी.

स्वाक्षरीत/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नांदेड

**प्रतिलीपी-माहिती स्तव सादर**

१. मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड,
२. गट विकास अधिकारी पंचायत समिती संबंधित जिल्हा नांदेड.
३. गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती संबंधित जिल्हा नांदेड.
४. संबधितास अनुपालनास्तव.

मुख्य कार्यकारी अधिकारी
**जिल्हा परिषद नांदेड करिता**